# <u>मा. अति. सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, कंधार जि. नांदेड</u>

**सत्र खटला क्रमांक ३९/२०२०**
**सरकार वि. विश्वनाथ**
निशाणी - २७

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी-</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | : | सुधीर शिवराज देशमुख, |
| **वय** | : | ३५ वर्षे |
| **व्यवसाय** | : | किराणा दुकान चालक |
| **राहणार** | : | कौठा, ता.कंधार, जि.नांदेड |

**<u>सरकारतर्फे सरतपासणी श्री.एम.बी.कागणे, सरकारी वकील यांच्यातर्फे :-</u>**

**१.** मी आरोपी विश्वनाथ यांस ओळखतो, हे म्हणणे खरे नाही. मी लाईनमन मोमीन खदीर अहमद यांना ओळखतो, हे म्हणणे खरे नाही. घटनेबाबत मला काही माहीत नाही. घटनेबाबत पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती.

<u>साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्यामुळे उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.</u>

**२.** माझे गावामध्ये किराणा दुकान आहे. दिनांक ०१.०२.२०१९ रोजी दुपारी १२:३० वाजता आरोपी व मोमीन खदीर हे माझ्या दुकानासमोर थांबले होते, हे म्हणणे खरे नाही. त्यावेळी आरोपीने मोमीन खदीर यांस तु माझ्या घराचा विद्युत पुरवठा खंडीत का केलास असे म्हणुन त्यास थापडा-बुक्यांनी मारहाण केली, हे म्हणणे खरे नाही. मागच्या एक वर्षापासुन आरोपीने विज बिल भरले नव्हते म्हणुन सदरचे भांडण झाले होते, हे मला माहित नाही.

**३.** सदरचे भांडण मी, शेषेराव सुडंगे व साहेबराव वाघमारे यांनी सोडवले होते, हे म्हणणे खरे नाही. पोलीसांनी अशा प्रकारचा माझ्या नावे जबाब का लिहुन घेतला, ते मला सांगता येणार नाही. मला रेखांकित भाग-अ वाचुन दाखविण्यात आला. तो पोलीसांनी का लिहीला ते मला माहित नाही.

**४.** आरोपी व मी एकाच गावचे आहोत. आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन.डी. कोळनूरकर : नकार.**

**'श्रवणोत्तर स्वीकृत'**

( **बी. यु. चौधरी** )

दिनांक: ०३.०२.२०२६

अति. सत्र न्यायाधीश-१, कंधार